ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B 3134. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, ७ ऑक्टोबर, १९६४ | अंक १९

(SCG-1 HIN)

# नहीं—
# यह कोई साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोड़े ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



नवल सोडा वाटर यंत्र — घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ४०८१२

### काजूंच्या निर्यात व्यापाराला तीव्र स्पर्धा होणार

इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ फॉरिन ट्रेड ह्या संघटनेतर्फे हिंदच्या काजूच्या बियांच्या आणि काजूच्या तेलाच्या निर्यातीबद्दल परिसंवाद भरविण्यांत आला होता. ह्या परिसंवादांत धंद्याचे प्रतिनिधि, केरळच्या सरकारच्या व्यापारखात्याचे प्रतिनिधि आणि इतर संबंधित ह्यांनीं भाग घेतला होता. परिसंवादाचें उद्घाटन करतांना केरळचे गव्हर्नर श्री. गिरी म्हणाले कीं आतांपर्यंत अमेरिकेच्या बाजारपेठेंत हिंदमधून निर्यात होणाऱ्या काजूगरांना आणि काजूपासून तयार होणाऱ्या इतर मालाला प्रतिस्पर्धी नव्हता. परंतु, ही परिस्थिति आतां राहिलेली नाहीं. ह्याचें कारण असें कीं आफ्रिकेंतील काजू पिकविणारे देश अलीकडे स्वतःच त्यावर संस्कार करणारे कारखाने काढूं लागले आहेत. त्यामुळें अमेरिकेंतील बाजारपेठेंत ते देश स्वतःच निर्यात करूं लागले आहेत. आतांपर्यंत आफ्रिकेंतील बहुतेक देश आपलें उत्पादन भारताला निर्यात करीत असत. भारतामधील काजूच्या कारखान्यांना पुरेसा कच्चा माल मिळण्यासाठी देशांतील उत्पादन शास्त्रीय पद्धतीनें वाढविणें अतिशय अगत्याचें झालें आहे. हिंदला डॉलर्सचें परदेशीय चलन मिळवून देणारा काजूचा हा धंदा दुसऱ्या क्रमांकाचा आहे. १९६३ सालीं ५४ हजार टन काजूंची निर्यात करण्यांत आली आणि त्यामुळें भारताला २२ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळालें. भारतांत काजूचें सुमारें २५० कारखाने आहेत आणि त्यांमधून १ लाखापेक्षां अधिक कामगार रोजंदारी करतात. ह्या कारखान्यांना २ ते २½ लाख टन कच्च्या काजूंची आवश्यकता असते. परंतु त्यांचा देशांतर्गत पुरवठा टँगानिका, केनिआ आणि पोर्तुगीज आफ्रिका ह्या देशांकडून होत असतो. तेव्हां देशांतील पुरवठा २½ लाख टनांपर्यंत होण्याची निकडीची गरज आहे.

### गृहमंत्र्याच्या कामाचें स्वरूप

हिंद सरकारचे गृहमंत्री श्री. नंदा ह्यांनीं स्वतःच्या कामाची तुलना नगरपालिकांच्या आरोग्य तपासनीस अधिकाऱ्यांशीं केली आहे. समाजांतील भ्रष्टाचार आणि लांचलुचपत उघडकीस आणून नाहींशीं करण्याच्या त्यांच्या सध्याच्या प्रयत्नास अनुसरून ही तुलना करण्यांत आली आहे. भ्रष्टाचाराचीं उदाहरणें सांगताना ते म्हणाले कीं कांहीं ठिकाणच्या शाळांतून शिक्षकांना २०० रुपयांच्या वेतनाच्या पावतीवर सही करावी लागते पण प्रत्यक्षांत त्यांना फक्त १५० रुपयेच घेऊन स्वस्थ बसावें लागतें. लग्नाच्या व्यवहारांतहि भ्रष्टाचार दिसून येतो. वर नोकरी करणारा असेल तर त्याच्या पगाराला महत्त्व देण्यांत येतेच. पण त्याचबरोबर पगासव्यतिरिक्त मिळणाऱ्या इतर उत्पन्नाचाहि विचार केला जातो. अशीं उदाहरणें सांगण्यानें आनंद होतो असें नाहीं; पण तीं समोरच आल्यावर त्यांचा समाचार घ्यावा लागतो.

### दिल्ली–लंडन विमानप्रवासाच्या वेळांत बचत

एअर इंडिआ इंटरनॅशनल कॉर्पोरेशनच्या दिल्ली–मॉस्को–लंडन ह्या मार्गावरील प्रवासाची पहिली फेरी २ ऑक्टोबर रोजीं झाली. सध्या कॉर्पोरेशनचीं विमानें पश्चिमेकडील मार्गानें लंडनला जातात. ह्या प्रवासासाठी त्यांना १६ तासांचा अवधि लागतो. मॉस्को मार्गानें फेऱ्या सुरू झाल्यावर प्रवासाच्या वेळांत ४ तासांची बचत होणार आहे. ह्या मार्गानें उड्डाण करण्यास विमानांना ११ तास, ३० मिनिटें वेळ पुरेल. ह्या वेळांत मॉस्को येथील विमानतळावर थांबण्याचा १ तास वेळ धरलेला आहे. आठवड्यांत दोन वेळां उलटसुलट मार्गानें विमानें जातील. नवीन मार्गानें प्रवास सुरू झाल्यावर सध्यां दर आठवड्याला दिल्ली ते मॉस्को जाणाऱ्या विमानांच्या फेऱ्या रद्द करण्यांत येणार आहेत.


प्रगतीच्या आघाडीवर

दि बेळगांव बँक लिमिटेड

'बँकिंगच्या' प्रगतीच्या आघाडीवर राहण्याचा, विशेषतः जेथें मोठ्या बँकांना विशिष्ट स्थानिक परिस्थितीशीं समरस होऊन तेथील जनतेच्या गरजा-आकांक्षांना अनुसरून काम करणें केवळ अशक्य आहे, अशा प्रादेशिक क्षेत्रांत आघाडीवर असण्याचा दि बेळगांव बँक लि. चा सतत प्रयत्न आहे.

आम्हीं अभिमानपूर्वक असें कां व कसें म्हणूं शकतों, तें प्रत्यक्षच येऊन पाहा !

खरोखर एखाद्या उत्कृष्ट बँकेंत जें जें अपेक्षित आहे, तें तें सर्व

दि
बे ळ गां व
बँ क
लि मि टे ड

मध्येंहि आपणांस खास अनुभवास येईल; आमच्याकडे थोडा व्यवहार करून प्रचीति पाहा !

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव

३. म्हैसूर आणि महाराष्ट्रांत ३३ शाखा



स्वस्तिकचा माल निर्यात होऊं लागला

—: कांहीं बोलके आंकडे :—

| | |
|---|---|
| १९६३ सालांतील मालाची विक्री | रु. २ कोटी, २ लक्ष |
| १९६३ अखेर वसूल भाग-भांडवल | रु. ४३,८१,४८५ |
| कामगारांची संख्या | १,२०० चे वर |
| कारखान्याच्या बांधलेल्या जागेचें क्षेत्रफळ | १,२०,००० चौ. फू. |

— प्रमुख उत्पादनें —

गमबूट्स—होजपाईप्स—प्रेशर होजेस
ग्लोव्ह्ज—इरेझर्स—ऑईल सील्स
व
स्वरूप केबल्स

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.
स्वस्तिक गृह, खडकी, पुणें ३.
(टेलिफोन नं. : ५५२०१)

# अर्थ

बुधवार, ७ ऑक्टोबर, १९६४



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे




## कोल्हापूर संस्थानांतील सहकार*
## ( १९२७ ते १९४१ )

सावंतवाडी संस्थानांत शेतकी सल्लागार म्हणून काम करीत असतांना श्री. बापूसाहेब शिर्के ह्यांनीं स्फूर्ति घेतली आणि ते नंतर कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत प्राणी व वनस्पतिशास्त्राचे प्राध्यापक झाल्यावर ती वाढीस लागली. प्राध्यापकाचें काम करीत असतांनाच ते असिस्टंट रजिस्ट्रारचें जादा काम करूं लागले. रविवारीं व इतर सुटीच्या दिवशीं सहकारी संस्था पाहण्याचें, त्यांना सुधारण्याच्या सूचना करण्याचें व नवीन संस्था काढण्याचें काम ते उत्साहानें करीत. २० जून १९२८ रोजीं त्यांनीं सहकारी परिस्थितीच्या आपल्या अभ्यासाच्या आधारें एक विस्तृत रिपोर्ट सादर केला आणि सहकाराचें धोरण इतःपर कसें राहावें, हें दिग्दर्शित केलें. ह्या रिपोर्टांतील सूचनेस अनुसरून दरबारनें सहकारी संस्थांना कर्ज देण्यासाठी एक लाख रुपये मंजूर करून आपली सक्रिय सहानुभूति व्यक्त केली.

श्री. बापूसाहेब शिर्के ह्यांच्या नेमणुका बदलत गेल्या, बढत्या मिळत गेल्या, त्याप्रमाणें त्यांचेकडील सहकारी खात्याचा दर्जा आणि क्षेत्र ह्यांतहि वाढ होत गेली; प्राइम मिनिस्टरांच्या ह्या चिटणिसाकडेच सहकारी खात्याचें रजिस्ट्रार पद आलें तेव्हां त्यांच्या कर्तृत्वाला विशेष वाव मिळाला. १९२७ नंतरच्या पुढच्या १४ वर्षांच्या काळांत सहकारी संस्थांचा आंकडा पावणे चारशेचें जवळ पोंचला; सभासद संख्या व खेळतें भांडवल सात पटींनें वाढलें. श्री. बापूसाहेबांच्या दोनहि 'नादां 'मुळें [ ( १ ) सुटीचे दिवस शक्य तो खेड्यांत घालवून सहकारी संस्थांच्या द्वारां शेतकऱ्यांचा आर्थिक उद्धार घडविणें आणि ( २ ) शेतकी व दुय्यम धंद्यांचीं प्रदर्शनें भरविणें. ] कोल्हापूरच्या जनतेचा खूपच दूरगामी फायदा झाला. मध्यवर्ती बँक आणि खरेदी-विक्रीसंघ ह्या आज भरभराटींत दिसणाऱ्या संस्थांची स्थापना आणि जोपासना, श्री. बापूसाहेबांच्या हाताखालींच झालेली आहे. "सहकारी खरेदी-विक्री हें सहकारी अर्थव्यवहाराचें मर्मस्थान आहे; यंदाच्या परिस्थितीमुळें तर तें अनन्य साधारण बनलें आहे" असें डॉ. धनंजयरावांनीं महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या अध्यक्षीय भाषणांत नुकतेंच सांगितलें; कोल्हापूरच्या खरेदी-विक्री संघाचें कार्य गेलीं २५ वर्षे चालू आहे. रजिस्ट्रार म्हणून सहकारी क्षेत्रांतील त्यांच्या कामगिरीसाठी त्यांना १९४१ मध्यें कैसर-इ-हिंद हे रावबहादुरांच्याहि वरच्या मानाचें रौप्यपदक देण्यांत आलें; पुढें पेरी राजवट सुरू होऊन श्री. बापूसाहेबांची बदली झाली आणि त्यांचा सहकारी चळवळीशीं असलेला जिव्हाळ्याचा संबंध खंडित झाला.

१९२७ ते १९४१ ह्या काळांतील आपल्या अनुभवाच्या आधारें, देशाच्या बदलत्या परिस्थित्यनुरूप सूचनात्मक लिहिण्याच्या प्रेरणेचें फळ, म्हणजेच प्रस्तुत पुस्तक होय. श्री. बापूसाहेबांना कांहीं महिने अमेरिकेंत राहून तेथील परिस्थितीचा, त्याचप्रमाणें इतर देशांतील परिस्थितीचा अभ्यास करण्याची संधि मिळाली; त्यांतून चिंतनास प्रारंभ होऊन लेखनीस चालना मिळाली. इतर देशांचें आपण अंधानुकरण न करतां, येथील शेतकऱ्यांच्या अडीअडचणी लक्षांत घेऊन उपाय योजायला हवेत; अमेरिका—रशियाकडे जाणाऱ्या तरुणांचा ओघ भारतानें जपानकडे वळवावयास हवा, असें श्री. बापूसाहेबांचें आग्रहाचें सांगणें आहे. आपल्या देशाला आतां स्पृहणीय असा एकजिनसीपणा आला आहे. येथून तेथून आतां एक प्रकारच्याच समस्या आहेत; तेव्हां सहकारी खात्याचें महत्त्व जाणून सहकारी खातें हें मध्यवर्ती खातें बनविणें अधिक इष्ट होय, त्यानें खर्चांतहि बचत होईल, असें त्यांनीं सुचविलें आहे.

मराठी शाळेपासून ते विद्यापीठापर्यंत सहकारी स्टोअर्स मुलांचेकडूनच चालविले गेले पाहिजेत, क्रमिक पुस्तकांतून सहकार विषयावर पाठ असायला हवेत, त्याचीं प्रात्यक्षिकेंहि घ्यावीत, शाळांतून सहकाराचा प्रचार करण्यासाठी एक स्वतंत्र असिस्टंट रजिस्ट्रारच असावा, सहकारी क्षेत्रांत नैपुण्य दाखविणारांना नोकरीचे वेळीं मान्यता मिळावी, काटकसरीची संवय दृढमूल करावी, शहरांतून सहकारी मालाच्या शोरूम्स स्थापाव्या, इत्यादि सूचना श्री. बापूसाहेब ह्यांनीं केल्या आहेत.

नानाविध सहकारी संस्थांमुळें नागरिकांच्या उत्पन्नांत किती भर पडली आहे व पडत आहे, जेथें अशा संस्था नाहींत किंवा कमी आहेत, त्यांच्याशीं कशी काय तुलना होते, इत्यादींच्या संशोधनासाठी सहकारी संस्थांनीं शिवाजी विद्यापीठाला एक भली मोठी रक्कम द्यावी, म्हणजे सहकारी विषयांतील पंडित पुढें येऊन उपयुक्त संशोधन करतील आणि त्यामुळें सहकाराचें पाऊल पुढें पडेल; कोल्हापूर जिल्ह्यांतील साखर कारखान्यांनीं एकत्र येऊन सहकार्यानें नवे नवे पदार्थ निर्माण करून भरभराट घडवून आणावी, ह्या त्यांच्या सूचना अत्यंत मोलाच्या आहेत.

श्री. बापूसाहेब शिर्के हे सहकारी चळवळीचें तळमळीचे अभ्यासक आणि अनुभवी कारभारी आहेत; त्यांनीं केलेल्या सूचना व्यापक, प्रदीर्घ अनुभव आणि ज्ञान, त्याचप्रमाणें आपल्या गरजा आणि अडचणी ह्यांवर आधारित आहेत. इतर देशांतील कल्पना आणि योजना येथें जशाच्या तशा रुजूं शकत नाहींत, हें त्यांनीं ओळखलें आहे. आपली सहकारी चळवळ स्वदेशी असायला हवी, हा त्यांच्या लेखनाचा मथितार्थ आहे. सहकाराच्या अभ्यासकांना आणि संशोधकांना मानाचें स्थान मिळणें अत्यंत अगत्याचें आहे; त्याखेरीज सहकारी संस्थांची निकोप वाढ होणें कठीण आहे. ह्या दृष्टीनें पाहतां श्री. बापूसाहेब ह्यांनीं ह्या उणीवेवर मोठ्या मार्मिकपणें बोट ठेवून त्यावर उपायहि नामी सुचविला आहे. त्यांच्या इतरहि सर्व सूचना विचारवंतांना पटणाऱ्याच आहेत. तळमळ, ज्ञान, अनुभव आणि चिंतन ह्यांचाच तो परिपाक आहे. श्री. बापूसाहेब शिर्के ह्यांचें प्रस्तुत पुस्तक सहकारी चळवळीस नवी दिशा दाखविणारें आहे; त्याचें सर्वत्र वाचन आणि मनन होऊन त्यांतून अनुरूप कृतीस चालना मिळो, अशी आमची प्रार्थना आहे.

---

* लेखक : श्री. शं. तथा बापूसाहेब शिर्के, बी. ए., बी. एस्सी., कैसर इ. हिंद, ८८३, पुणें ४. पृ. सं. ४८. किं. सवा रुपया.

## पुण्यांत भरणारें औद्योगिक प्रदर्शन

### लॉर्ड रे औद्योगिक संग्रहालयाचा उपक्रम

पुणें शहर व जिल्हा यांमध्यें गेल्या कांहीं वर्षांत कारखानदारीची वाढ झपाट्यानें होत असून वेगवेगळ्या प्रकारच्या मालाचें उत्पादन करणारे नवीन नवीन लहान मोठे कारखाने निघत आहेत. या कारखान्यांची माहिती जनतेला व विशेषत: तरुण पिढीला व्हावी ह्या उद्देशानें एक प्रदर्शन भरविण्याची कल्पना बऱ्याच दिवसांपासून संग्रहालय विश्वस्त समिति व मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज यांचें विचाराधीन आहे. या निमित्तानें मोठे कारखाने व त्यांना आवश्यक असें साहित्य बनविणारे छोटे कारखाने यांना एकत्र आणून मोठ्या कारखान्यांच्या गरजा व छोट्यांचें उत्पादन-कौशल्य यांची सांगड घालावी हाहि एक उद्देश असें प्रदर्शन भरविण्यामागें आहे.

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या नवीन इमारतीचा कांहीं भाग आतां बांधून पूर्ण झाला आहे; व या भागाचें उद्घाटन येत्या विजयादशमीच्या सुमुहूर्तावर होणार आहे. या उद्घाटनाच्या निमित्तानें अशा प्रकारचें एक प्रदर्शन भरविण्याचें संग्रहालय विश्वस्त समितीनें निश्चित केलें असून पुणें जिल्ह्यांतील व महाराष्ट्रांतील कारखानदारांना या प्रदर्शनांत भाग घेण्याची विनंती करण्यांत आली आहे. या प्रदर्शनास साहाय्य करण्याचें मराठा चेंबर ऑफ कॉमर्स यांनीं मान्य केलें आहे.

प्रदर्शनांत भाग घेणाऱ्या कारखानदारांसाठी बऱ्याच सोयी करण्यांत आल्या आहेत—( १ ) संग्रहालयाच्या शो-केसेसमध्यें ते आपला माल मांडूं शकतील. या शो-केसेस वेगवेगळ्या आकाराच्या व डिझाइन्सच्या असून स्वत:चा माल मांडण्यास सोयीच्या अशा शो-केसची निवड कारखानदारांना करतां येईल. ( २ ) या पद्धतीमुळें कारखानदारांना स्वत:ची ४-६ माणसें महिनाभर मालाची देखरेख करण्यासाठी गुंतवून ठेवावीं लागणार नाहींत व त्यामुळें उत्पादनांत अडथळाहि येणार नाहीं. ( ३ ) माहितीपत्रकें, दरपत्रकें वांटण्यासाठी संग्रहालयाकडून सेवकवर्ग नेमण्यांत येणार आहे. ( ४ ) निरनिराळ्या कारखानदारांना आपसांत भेटून चर्चा करण्याचें सोयीचें व्हावें म्हणून एक स्वतंत्र हॉल राखून ठेवण्यांत येईल. ( ५ ) कारखानदारांनीं आणलेल्या फिल्मस् व स्लाइडस् दाखविण्याची सोय करण्यांत येईल. ( ६ ) शो-केसेसमध्यें दिव्यांची सोय आहे. त्यामुळें मालाची मांडणी आकर्षक पद्धतीनें करतां येईल.

हें प्रदर्शन दिनांक १५ ऑक्टोबर ते १४ नोव्हेंबर १९६४, दररोज दुपारीं २ ते रात्रीं १० पर्यंत उघडें राहणार आहे. प्रदर्शनाची मुदत दिनांक ३० नोव्हेंबरपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. प्रदर्शनाची वेळ नागरिक, महिला, विद्यार्थी, कारखानदार, व्यापारी व कामगार सर्वांनाच सोयीची राहील. प्रदर्शनासाठी ५ पैसे हें नाममात्र प्रवेशमूल्य ठेवण्यांत येईल व शिक्षणसंस्थेतर्फे गटानें येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी फक्त एक पैसा प्रवेशमूल्य पडेल.

शनिवारीं प्रवेशमूल्य दहा पैसे पडेल.

गो. बा. सरदेसाई
चिटणीस
विश्वस्त समिति




शीतल, झुळझुळीत,
आणि वापरायला
अत्यंत मनोरम व सुखद
ठाकरसी
फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती फॅब्रिक्स
या कापडावर असें लेबल असतें
SANFORIZED

THACKERSEY FABRICS
ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स
● धी हिंदुस्तान स्पिनिंग अँन्ड वीव्हिंग मिल्स कंपनी लिमिटेड
● धी क्राउन स्पिनिंग अँन्ड मॅन्यु. कंपनी लिमिटेड
● धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# सहकारी बँकांचे अहवाल

### जळगांव जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि.

बँकेच्या ४५ शाखा असून सालअखेर आणखी २–३ ठिकाणीं शाखा उघडण्याचें ठरलें आहे. वसूल भाग भांडवलांत ७½ लक्ष रु. ची भर पडून तें ६१,८८,३०० रु. झालें. ठेवी ५ कोटी, १७ लक्ष रु. च्या आहेत. बऱ्याचशा सहकारी संस्थांनीं सभासदांचे मालाची विक्री सहकारी संस्थांमार्फत होण्यासाठी विशेष प्रयत्न केले. बँकेनें दिलेलीं कर्जे ४ कोटी रु. चीं आहेत; मंजूर कर्जे सुमारें ७ कोटी रु. चीं होतीं. सहकारी क्षेत्रांतून औद्योगिक प्रगति होणेसाठी भुसावळ येथें सहकारी तत्त्वावर प्रक्रिया करणारी सूत गिरणी सोसायटी उघडण्यांत आली आहे. बँकेनें विविध प्रकारचीं कर्जे देऊन आपलें उपयुक्त कार्य चालविलेलें आहे. एकूण नफा ५,९३,०४६ रु. झाला.

अध्यक्ष : जुलालसिंग शंकरराव पाटील, बी. ए., एलएल्. बी.
उपाध्यक्ष : कृषिपंडित व्यंकटराव भगा पाटील
कार्यसंचालक : नामदेव नारायण भिरूड, बी. कॉम; जी. डी. सी. अँड ए.

---

### दि वाई अर्बन को. बँक लि.

सभासदसंख्या ११२७, भाग भांडवल ४९,८२५ रु., रिझर्व्ह फंड ४३,१३३ रु., ठेवी ७,३८,१४१ रु., इतर निधि ८८,०७३ रु., भांडवल गुंतवणूक ४,४१,६१६ रु., खेळतें भांडवल ९,२४,७०८ रु., नफा १३,४०७ रु. असे ह्या बँकेचे प्रमुख आंकडे आहेत. गतवर्षापेक्षा यंदा सभासदांना १,६७,३२४ रु. इतकें जास्त कर्ज दिलें आहे. दैनंदिन खर्च वाढता असूनहि निव्वळ नफ्यांत ८५० रु. नीं वाढ झाली आहे आणि रिझर्व्ह फंडाची भरपाई वर्गणी ५,००० रु. काढूनहि ६¼% डिव्हिडंड देता येत आहे.

चेअरमन : अमृत चुनीलाल गांधी, व्यापारी.
ऑ. सेक्रेटरी : द्वारकानाथ रामचंद्र जोशी, प्रेस मालक.
मॅनेजर : पराशर कृष्ण अभ्यंकर, बी. कॉम., एल. एल. बी.

---

### दि सातारा डि. सें. को. बँक लि.

चालू सालीं मुख्य कार्यालय धरून १९ शाखा काम करीत होत्या. भाग भांडवल ४५,८५,५५० रु., राखीव व इतर निधि ११,००,०६८ रु., बाहेरील कर्जे ९५,३८,३०२ रु., ठेवी २,५६,५९,५६५ रु., गुंतवणूक ५०·४२ लक्ष रु., रोकड व बँकांत ८२.८३ लक्ष रु. असे प्रमुख आंकडे आहेत. निरनिराळ्या प्रकारच्या सोसायट्यांना मिळून ५४१ लक्ष रु. च्या मर्यादा बँकेनें मंजूर केल्या होत्या; म्हणजे गेल्या वर्षीपेक्षा १२५ लक्ष रु. च्या जास्त मर्यादा होत्या. मध्यम मुदतीच्या कर्जांत दुभत्या जनावरांस सुमारें २ लक्ष रु. च्या नवीन कर्जमर्यादा आहेत. कोयना सहकारी दूध पुरवठा संघ लि. च्या कार्यक्षेत्रांतील प्रयोगानंतर हे प्रयोग इतर ठिकाणीं सुरू करण्याचा विचार आहे. त्यासोबत कुक्कुटपालनासारख्या योजनाहि चालू केल्या जातील. अहवालाच्या वर्षी बँकेस ३,२८,६३९ रु. नफा झाला. बँकेच्या मुख्य कार्यालयाची इमारत पुरी होत आली असून तिचें उद्घाटन २६ जानेवारी, १९६५ रोजीं करतां येईल अशी अपेक्षा आहे.

अध्यक्ष : रघुनाथराव दौलतराव पाटील, एलएल्. बी.
उपाध्यक्ष : राजाराम तुकाराम घोरपडे
मॅनेजर : स. गो. तिळवे, बी. ए. (ऑनर्स), एलएल. बी.
असि. मॅनेजर : व्यं. ज्ञा. मोसले, बी. कॉम., जी. डी. सी. ए.

### दि इस्लामपूर अर्बन को. बक लि.

सभासदसंख्या २७२ ची ४२० होऊन भाग भांडवल ४,१२५ रु. नीं वाढून ३२,२५० रु. झाले. गुंतवणूक ९२,६०४ रु. चीं आहे. रिझर्व्ह फंडांत १७,९६२ रु. असून ठेवींची रक्कम ६४ हजार रु. नीं वाढून २,८६,६६४ रु. झाली आहे. एकूण २,०६,०२० रु. चीं कर्जे दिलेलीं आहेत. खेळतें भांडवल ३¼ लक्ष रु. चें ४ लक्ष रु. झालें आहे.

चेअरमन : गोपाळ लक्ष्मण फडणीस, बी. ए., एल्. एल्. बी.
व्हा. चेअरमन : उस्मान फत्तू मुल्ला.
सेक्रेटरी : बी. के. बोरकर.

---

### दि भुसावळ पीपल्स को. बँक लि.

शेअर भांडवल १,८९,१५० रु., निधि ३,३८,६०८ रु., ठेवी ३६,५०,८४९ रु., कर्जे १४,६९,७८० रु., इनव्हेस्टमेंट १८,९१,७६० रु., खेळतें भांडवल ४३,८८,२४९ रु., नफा ३८,३६६ रु. असे प्रमुख आंकडे आहेत. अहवालाच्या वर्षी बँकेनें १६ लक्ष, २८ हजार रु. चीं कर्जे दिलीं; त्यांपैकी १३ लक्ष रु. चीं कर्जे व्यापाराकरितां होतीं आणि १¾ रु. चीं कर्जे आजारपणासाठी होतीं. "चालू परिस्थितींत कर्जवसुली समाधानकारक झाली." बँकेच्या मेडिकल वस्तूंच्या योजनेचा ७३ सभासदांनीं फायदा घेतला.

चेअरमन : आर. एस. पाटील, बी. ए., एलएल. बी.,
व्हाइस चेअरमन : सदाशिव दामोदर नाईक, वकील
मॅनेजर : विश्वनाथ सदाशिव पाटील, बी. कॉम.
ऑ. असि. मॅनेजर : एम्. बी. साठे

---

### दि कोल्हापूर अर्बन को. बँक लि

सभासदसंख्या ४,६५६; रिझर्व्ह व इतर फंडस २,२३,३३५ रु., ठेवी १२,१७,०९८ रु., इनव्हेस्टमेंट्स ५,००,८८५ रु., कर्जे १०,५२,१४४ रु., नफा ३१,०६२ रु., असे ह्या बँकेच्या ५१ व्या वार्षिक ताळेबंदांतील प्रमुख आंकडे आहेत. बँकेनें २२ मे, १९६४ रोजीं राजारामपुरी भागांत शाखा उघडली. बँकेचा सुवर्णमहोत्सव आणि बँकेचे संस्थापक कै. ना. भास्करराव जाधव ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण, हीं लवकरच घडवून आणलीं जातील. भागदारांना ९% डिव्हिडंड मिळेल.

प्रेसिडेंट : ज्ञानदेव जोती सासने
व्हा. प्रेसिडेंट : शंकरराव परशराम माने
मॅनेजर : ए. ए. बोगार, बी. ए., बी. कॉम

---

### दि इचलकरंजी अर्बन को. बँक लि.

बँकेच्या कार्यक्षेत्रांतून आजरे विभाग कमी झाल्यामुळें सभासद संख्या २३६ नें घटली, तरी शेअरभांडवल ७१,८५० रु. नें, फंड ३९,३७१ रु. नीं, ठेवी ५½ लक्ष रु. नीं आणि खेळतें भांडवल ८ लक्ष रु. नीं वाढलें आहे. एकूण खेळतें भांडवल आता अर्ध्या कोटीचे वर गेलें आहे. कर्ज येणें २८¾ लक्ष रु. आहे. इचलकरंजीचे उद्योगधंदे वाढत असल्यामुळें कर्ज मागणी मोठ्या प्रमाणावर येत आहे. बँकेस १,०४,४९३ रु. नफा झाला. गेल्या वर्षी तो ५८,०२५ रु. होता.

चेअरमन : दत्तात्रय बाबुराव कदम.
व्हा. चेअरमन : पिरगोंडा बाळगोंडा पाटील.
मॅनेजर : श्री. ज. दांडेकर.
असि. मॅनेजर : शं. द. घोरपडे.

### दि तासगांव अर्बन को. बँक लि.

सभासदसंख्या ७४६, शेअरभांडवल ४१,८१० रु., रिझर्व्ह व इतर फंडस् ७९,२१२ रु., ठेवी ५,०४,६४७ रु., कर्जें ३,८०,०६४ रु. असे ह्या बँकेचे प्रमुख आंकडे आहेत. बँकेनें गेल्या वर्षीं सुमारें ११ लक्ष रु. चा हुंडी व्यवहार केला. थकबाकीचा प्रश्न बँकेनें संपूर्णपणें सोडविला आहे; कर्जवसुलीचे कामीं कडक धोरण स्वीकारलें आहे. बँकेस १६,२९४ रु. नफा झाला.

**चेअरमन :** शंकर जगन्नाथ कुत्ते.

**व्हा. चेअरमन :** भगवान रामचंद्र कदम.

**मॅनेजर :** एम. पी. कुळकर्णी, बी. कॉम.

### दि कागल को. बँक लि.

शेअर भांडवल ५५,८३० रु., गंगाजळी ७९,५४१ रु., इतर निधि ४४,९१३ रु. असें आहेत; म्हणजे बँकेचें स्वतःचें भांडवल १,८०,२८४ रु. आहे. गेल्या वर्षी तें १,६८,७५६ रु. होतें. ठेवींत १,२८,४५६ रु. चीं भर पडून त्यांची रक्कम ४,९०,२०३ रु. झाली. येणें कर्जें ३,१०,२१३ रु. चीं आहेत. त्यांचें खेळत्या भांडवलाशीं प्रमाण ५०% पेक्षा कमी आहे. बँकेस ११,००१ रु. नफा झाला.

**प्रेसिडेंट :** गणपतराव शंकरराव गाताडे.

**व्हा. प्रेसिडेंट :** नारायण बाळाराम मोरे.

**मॅनेजर :** गणपतराव हरिभाऊ शिंदे.

### दि मराठा को ऑ. बँक लि. बेळगांव.

अहवाल सालीं शेअर भांडवल २०,७२५ रु. नीं वाढून तें १,५७,६५५ रु. झालें. रिझर्व्ह व इतर फंडांत सुमारें २ लक्ष रु. असून ठेवी २११/२ लक्ष रुपयांच्या आहेत; खेळतें भांडवल २५१/२ लक्ष रु. चें आहे. निव्वळ नफा ४१,९८३ रु. झाला. गेल्या वर्षी ठेवींत ४ लक्ष रु. ची वाढ झाली आहे. कर्जांची रक्कम १११/२ लक्ष रु. आहे. गेल्या वर्षअखेर ती ८१/२ लक्ष रु. होती. कर्जमागणी दिवसेंदिवस वाढत आहे. गोडाऊन माल तारण कर्ज व्यवहार वाढविण्याचा बोर्डानें प्रयत्न केला आहे.

**चेअरमन :** विठ्ठलराव नागोजीराव मिसाळ, बी. ए. एलएल. बी.,

**व्हा. चेअरमन :** रघुनाथराव रामचंद्रराव शिंदे.

**मॅनेजर :** ए. के. सोमणाचे.

**असि. मॅनेजर :** आर. ए. पाटील.

### जनता सहकारी बँक लि., सांगली

ह्या बँकेनें अवघ्या ३१/२ वर्षांच्या अवधींत खूपच प्रगति केली आहे. तिचें वसूल भांडवल २,२५,६५० रु. झालें असून रिझर्व्ह व इतर फंडस् ३९,८७४ रु. झाले आहेत. ठेवींची रक्कम १५ लक्ष रु. वर गेली आहे आणि खेळतें भांडवल ४१ लक्ष रु. झालें आहे. गेल्या वर्षीच्या मानानें ठेवींत २ लक्ष, ३१ हजार रु. ची भर पडली आणि खेळतें भांडवल १३ लक्ष रु. नीं वाढलें. बारा महिन्यांतील उलाढाल सुमारें ८ कोटी रु. ची झाली आहे. बँकेनें २७ लक्ष रु. चीं कर्जें दिलीं आहेत; ७ लक्ष रु. रोख व बँकांत ठेवून ४ लक्ष रु. रोख्यांत गुंतविलें आहेत. माल गहाणाचा व्यवहार अपेक्षेपेक्षा चांगलाच झाला आहे. बँकेनें आपली एक शाखा सांगली मार्केट यार्डमध्यें २६ जानेवारी, १९६४ रोजीं उघडली. बँकेस ४२,८३० रु. नफा झाला. त्यांतून रिझर्व्ह फंडांत ३०,८०० रु. टाकून २% डिव्हिडंड देण्यांत येईल.

**चेअरमन :** मल्लिकार्जुन साताप्पा कराळे.

**व्हा. चेअरमन :** आमदार वसंतराव बंडूजी पाटील.

**मॅनेजर :** एस. एस. पांड्याजी.

### दि पूना अर्बन को-बँक लि.

एकूण ठेवींत ९६ हजारांची वाढ होऊन त्यांची रक्कम ८,६८,०१७, रु. झाली. भाग भांडवल १,७७,३०० रु. असून रिझर्व्ह व इतर फंडस् ९९,०४२ रु. आहेत. बँकेची गुंतवणूक ४१/२ लक्ष रु. आहे आणि कर्जें ६१/२ लक्ष रु. चीं आहेत. नफा १८,१३८ रु. झाला. महागाई असताहि थकबाकी न वाढतां कमीच झाली आहे.

**कार्याध्यक्ष :** मारुतीराव मल्हारराव पवार.

**उपकार्याध्यक्ष :** व्यंकटेश नागेश पोळ.

**कार्यावाह :** पु. वि. कुळकर्णी.

### दि महाड को. अर्बन बक लि.

वसूल भांडवल ९०,३७५ रु. निधि १,५३,००३ रु., ठेवी ४,३९,४२२ रु. गुंतवणूक २,५७,६४७ रु., कर्जें ३,९९,०९४ रु., नफा ११,८५५ रु. असें प्रमुख आंकडे आहेत. बँकेनें मालगहाण तारणावरचा धंदा गेल्या वर्षीच्या मानानें दुपटीचेवर केला. ४% डिव्हिडंडला ३,५९८ रु. लागतील.

**चेअरमन :** दत्तात्रय नरहर वैद्य, बी. ए., एलएल. बी.,

**व्हा. चेअरमन :** मोहन सुंदर मेहता, बी. ए.

**मॅनेजर :** एस्. एन्. ओक.

### दि शिरपूर मर्चंट्स को. बँक लि.

भागभांडवल ९९,९०० रु. चें १,४७,२५० रु. झालें असून ठेवींतहि वाढ होऊन त्यांची रक्कम ११,०८,५७१ रु. झाली आहे. बँकेनें ९,४०,२७८ रु.-चीं कर्जें दिलेलीं आहेत. त्यांपैकी ४,१८,१४१ रु. चीं कर्जें माल तारणावर आणि २,६२,७८३ रु. चीं कर्जें जामिनकीवरील कॅश क्रेडिट्सचीं आहेत. अहवालाचे वर्षी सर्वच खात्यांत वाढ झाल्यामुळें नफाहि ९,५०० रु. नीं जास्ती होऊन तो ३१,४९९ रु. झाला आहे. बँकेनें शिरपूर ॲग्रि. प्रोड्यूस मार्केट कमिटीचे यार्डवरील एक गोडावून भाड्यानें घेतलें आहे. त्यांत सभासदांचा माल ठेवून त्यावर कर्ज देण्याची योजना सुरू होणार आहे. भागीदारांस ९% दरानें डिव्हिडंड दिलें जाईल.

**अध्यक्ष :** छगनलाल मोतीलाल भंडारी.

**उपाध्यक्ष :** हरीलाल झुमकलाल वाणी, बी.ए., एलएल. बी.,

**मॅनेजर :** मा. ग. ओसवाल.

### मराठा मार्केट पीपल्स को. बँक लि. मुंबई

ह्या बँकेची प्रगति द्रुतगतीनें होत असून ती सुस्थितींत येत आहे; तिचा पाया आर्थिकदृष्ट्या भक्कम होत चालला आहे. पूर्वीच्या कांहीं वर्षांतील शिल्लक तोटा असूनहि बँकेनें उत्कृष्ट कारभार करून आणि १५,४०६ रु. नफा मिळवून 'अ' वर्ग मिळविला आहे. अहवालाचे सालीं खेळत्या भांडवलांत ३१/२ लक्ष रु. ची वाढ होऊन तें १३१/२ लक्ष रु. झालें. शेअर भांडवल ४३,५१० रु. नीं वाढून तें २,२४,३४० रु. झालें. रिझर्व्ह फंडांत ६५,३७० रु. आहेत. सर्व प्रकारच्या ठेवींत वाढ झालेली आहे. येणें कर्जें ४,८२,७४० रु. चीं आहेत; रोख्यांत ३,८०,०१३ रु. आणि ३,६६,७४७ रु. रोख व बँकांत आहेत. कॅश क्रेडिट्स, अल्प मुदतीच्या हुंड्या, इत्यादींचा व्यवहार लवकरच सुरू केला जाईल. "सभासद कर्ज फेड वेळेवर करीत असून डायरेक्टर बोर्डास सहकार्य देत आहेत असें अहवालांत म्हटलें आहे.

**चेअरमन :** गेनुभाऊ गोविंदराव ढोले.

**व्हा. चेअरमन :** मळीबुवा मार्तंड वामन.

**मॅ. डायरेक्टर :** ज्ञानेश मारुतीराव मनसुख.

## ठाणें जिल्हा म. सहकारी बँक लि.

मागील सालअखेरीस बँकेचें भाग भांडवल १३,७४,९५० रु. होतें, तें आतां १५,६०,८०० रु. झालें आहे. गंगाजळी व इतर निधींची रक्कम १,१५,१०१ रु. झाली आहे. एकूण ठेवींत ४४·४९ लाखांची वाढ होऊन त्यांची रक्कम १५५·७८ लक्ष रु. झाली आहे. बँकेचें तरतें भांडवल नेहमींच नियमापेक्षा सरासरी २५ लक्ष रु. नीं जास्त होतें. बँकेनें कर्जाऊ दिलेल्या रकमा ८७,२०,०३० रु. च्या आहेत. अहवाल सालीं बरीच जुनी थकबाकी वसूल झालेली दिसते. सहकारी यंत्रणेमार्फत दिलेली पीक–कर्जें गरजा पुरेशा भागविण्या-जोगीं असावीत, ह्या दृष्टीनें योजना चालू आहेत. शेतकऱ्यांना जोडधंदा मिळावा म्हणून दुभतीं जनावरें खरेदी करण्यास मध्यम मुदत-कर्जें देण्यास प्रारंभ झाला आहे. मच्छीमार सोसायट्यांचें कर्ज वसूल होणें कठीण जात आहे. बिगर-शेती सोसायट्यांचा व्यापहि वाढत आहे. निव्वळ नफा ५९,५८१ रु. झाला. भाग भांडवल व ठेवी ह्यांचीं ठरविलेलीं उद्दिष्टें निश्चित पुरीं होत आहेत.

**चेअरमन :** श्री. वैं. धामणकर

**व्हा. चेअरमन :** द. दा. काळे

**मॅनेजर :** भा. के. धामणकर, बी. ए. (ऑनर्स), एच. डी. सी., सी. ए. आय. आय. बी.

## सारस्वत को. बँक लि., मुंबई

ह्या बँकेची भक्कम पायावरील प्रगति अखंड चालू आहे. अहवालाचे वर्षीं सभासद संख्येंत ९१० ची वाढ होऊन ती ९,४०९ पर्यंत गेली. खेळत्या भांडवलांत ४६ लक्ष रु. चीं भर पडून तें ४५० लक्ष रु. झालें. त्यांपैकीं बँकेच्या मालकीचा फंड २४·५७ लक्ष रु. चा (पूर्वीच्या वर्षीं २१·५२ लक्ष रु.) असून ठेवी ४१५ लक्ष रु. (पूर्वीच्या वर्षीं ३७३ लक्ष रु.) आहेत. तरतें भांडवल/ठेवी हें प्रमाण ७१% असून कर्जें/ठेवी हें प्रमाण ३४% आहे. बँकेच्या वाढत्या विस्तारास अनुसरून शेअर-भांडवल २५ लक्ष रु. करण्यांत यावयाचें आहे. डिव्हिडंड ७% ह्या वाढत्या दरानें दिलें जाईल. बँकेकडे ठेवींची एकूण ३३,१०६ खातीं आहेत. त्यांपैकीं ९६ टक्के खातीं १ रु. ते ५००० रु. ह्या वर्गांतील आहेत व त्यांतील रक्कम एकूण ठेवींच्या ४३% आहे. २५ हजार रु. वरील ८२ खातीं असून त्यांत एकूण ठेवींच्या २६·८४% म्हणजे १११·३१ लक्ष रु. रक्कम आहे. लहान उद्योगधंद्यांतील समस्यांचा विचार करून त्यांना जास्तींत जास्त आर्थिक साहाय्य देण्याकडे बँकेचें विशेष लक्ष असतें. मध्यवर्ती सरकारच्या गॅरंटी स्कीममध्यें बँक सामील आहे. छापखाने, ब्लॉक व प्रोसेसिंग, रासायनिक द्रव्यें, टिन प्लेट व प्लॅस्टिकपासून केलेली उपकरणें, फाउंड्री, पोलादी अवजारें व हत्यारें, सुटे भाग, इलेक्ट्रिक पंप, मोटर, पंखे, स्टेनलेस स्टीलचे उपयुक्त भाग, कातड्यापासून बूट व मिलला लागणारी सामग्री, यांत्रिक भाग व पेपरकोन, मिठागरें, मच्छीमारी, वगैरे उद्योगधंद्यांना बँकेनें बहुमोल मदत केली आहे. ह्या सदराखालीं दिलेलीं कर्जें एकूण कर्जांच्या ४०% होतीं. बँकेस निव्वळ नफा २·६९ लक्ष रु. झाला.

**अध्यक्ष :** वामन पुंडलिक वर्दे, बी. कॉम., एफ. आय. बी. (लंडन)

**उपाध्यक्ष :** लक्ष्मीकांत गंगाधर खेडकर, एम. ए., एलएल बी.

**चिटणीस :** शंभु विनायक संझगिरी, बी. कॉम.

## दि अष्टा अर्बन को बँक लि.

ह्या बँकेच्या सभासदांत १०१ चीः भर पडून त्यांची संख्या १५५३ झाली. वसूल भाग भांडवल अधिकृत भाग भांडवलाइतकेंच म्हणजे १,५०,००० रु. झालें आहे. रिझर्व्ह फंडासह एकूण फंड्स ३३,५१३ रु. चे आहेत. ३०–६–६३ अखेरच्या वर्षी ठेवींत १,३७,१६७ रु. ची वाढ झाली होती आणि ह्यावर्षी पुनः ४२,७५५ रु. ची वाढ झाली आहे. येणें कर्ज ५,९४,००४ रु. आहे. दिलेलें कर्ज व वसूल कर्ज ह्यांचें प्रमाण ९८% पडलें. सरकारी रोख्यांतील गुंतवणूक १,१३,५०० रु. एवढी आहे. बँकेस १८,३२७ रु. नफा झाला.

**चेअरमन :** बी. डी. वाडकर

**मॅनेजिंग डायरेक्टर :** एन्. ए. रुकडे

## श्री बलभीम को. बँक लि., कोल्हापूर

बँकेचें शेअर भांडवल १,४३,३५० रु. चें १,५९,८०० रु. झालें आहे. एकूण व्यवहार २१ लक्ष रु. चा झाला होता तो आतां ३५ लक्ष रु. चा झाला आहे. एकूण ठेवी ६ लक्ष, ८१ हजारांच्या १० लक्ष रु. वर गेल्या. खेळतें भांडवल १२ लक्ष रु. चें १५½ लक्ष रु. झालें. बँकेस १४,७८० रु. नफा झाला. सभासदांच्या आर्थिक गरजेप्रमाणेंच त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, आरोग्यविषयक व इतर जरुरीच्या विविध बाबींकडे लक्ष पुरविणारी अशी बँक सबंध महाराष्ट्रांत एखादीच असेल. त्याचा तपशील अहवालांत दिलेला आहे.

**प्रेसिडेंट :** मारुती ऊर्फ पंढित परशराम जाधव.

**व्हा. प्रेसिडेंट :** पंढितराव गणपतराव माने.

**मॅनेजर :** बळवंत दत्तात्रय सरनाईक.

## साखरेचें उत्पादन आणि निर्यात

साखर कारखान्यांच्या येत्या हंगामांत साखरेचें उत्पादन मागील हंगामाच्या मानानें वाढवितां येणें शक्य आहे अशी माहिती मध्यवर्ती सरकारचे अन्न व शेतकीमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांनीं लोकसभेंत सांगितली. ते पुढें म्हणाले कीं, गेल्या दोन हंगामांत साखरेच्या मानानें गुळाचें उत्पादन अधिक झालेलें आहे. गेल्या ऑगस्टअखेर भारतामधून २ लाख, १७ हजार, ३ शें टनांच्या आसपास साखरेची निर्यात करण्यांत आली. निर्यात मुख्यतः अमेरिका, कॅनडा, जपान, मलेशिआ, आस्ट्रेलिआ, इत्यादि देशांना करण्यांत आली. पुढील वर्षासाठी साखरेच्या निर्यातीचें उद्दिष्ट अद्याप ठरविण्यांत आलेलें नाहीं. परंतु साखर अमेरिकेंत निर्यात करण्याची शक्यता अजमावण्यासाठीं एक प्रतिनिधिमंडळ नुकतेंच अमेरिकेला पाठविण्यांत आलें आहे. सध्यां अमेरिकेंत साखरेची बाजारपेठ तेजींत आहे.

## "अर्था" चा दिवाळी अंक

बुधवार, दि. ४ नोव्हेंबरचा अंक हा दिवाळीचा मोठा अंक म्हणून प्रसिद्ध होईल.

त्यानिमित्त बुधवार, दि. २१ ऑक्टोबरचा अंक निघणार नाहीं.

## होळ नं. २ वि. का. स. सोसायटी लि.

**( मु. पो. होळ, ता. बारामती, जि. पुणें )**

होळ नं. २ विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि., होळ या सोसायटीची १८ वी वार्षिक साधारण सभा सोमवार ता. २१-९-१९६४ या दिवशीं झाली. या सभेमध्यें सन १९६४-६५ करितां खालील १० सभासदांचें व्यवस्थापक मंडळ एकमतानें निवडण्यांत आलें—

**सोसायटी प्रतिनिधि ( ६ )**-( १ ) श्री. बाबुराव बळवंतराव धुमाळ ( चेअरमन ), सभासद—( २ ) श्री. बाबुराव पांडुरंग फराटे, ( ३ ) श्री. रामचंद्र बळवंतराव ढिसले, ( ४ ) श्री. विठ्ठलराव निवृत्तिराव सणस, ( ५ ) श्री. दिगंबर शंकरराव गाढवे, ( ६ ) श्री. एकनाथ रामभाऊ कदम.

**सहकारी खात्याचे प्रतिनिधि ( ३ )** सभासद—( ७ ) श्री. आनंदराव बळवंतराव धुमाळ, ( ८ ) श्री. बाबुराव नानासाहेब घाडगे, ( ९ ) श्री. सुपरवायझर, बारामती.

**जिल्हा मध्यवर्ती बँक प्रतिनिधि ( १ )** सभासद—( १० ) श्री. बँक इन्स्पेक्टर, निरा शाखा.

सभेंत सभासदांना सन १९६३-६४ चे रु. ४२,१६६ निव्वळ नफ्यांतून ९ टक्केप्रमाणें रु. १२,००० डिव्हिडंड वांटण्यांत आला. तसेंच नोकरांना २ महिन्यांच्या पगाराइतकी रक्कम बोनस म्हणून वांटण्यांत आली. सोसायटीचें खेळतें भांडवल ७ लाख रुपये आहे. मेंबर शेअर्स १,५१,६२५ व निरनिराळे फंड रुपये ५९,९६० चे आहेत. संस्था गेलीं १५ वर्षें सतत अ वर्गांत आहे.

## दि कॉसमॉस को ऑपरेटिव्ह अर्बन बँ. लि. पुणें.

**नवीं अधिकार मंडळें**

**मा. सल्लागार मंडळ**—( १ ) श्री. वा. रा. होनप, अध्यक्ष ( २ ) श्री. डॉ. न. का. घारपुरे, उपाध्यक्ष ( ३ ) श्री. गं. मो. भणगे ( ४ ) श्री. रा. द. भट ( ५ ) श्री. का. वा. सुभेदार

**मा. कार्यकारी मंडळ** ( १ ) शं. वि. दिवाकर, कार्याध्यक्ष ( २ ) श्री. द. म. देव, उपकार्याध्यक्ष ( ३ ) श्री. डॉ. सु. मा. कुलकर्णी ( ४ ) श्री. अ. बा. देहाडराय ( ५ ) सौ. आशा वि. हर्डीकर ( ६ ) श्री. भ. म. राडकर ( ७ ) श्री. ह. गो. महाजन ( ८ ) श्री. स. ख. भागवत ( ९ ) म. ग. खांडेकर ( १० ) श्री. स. स. देशपांडे ( ११ ) द. मो. पाटसकर

**मा. स्थानिक आयव्यय निरीक्षक**—( १ ) श्री. म. न. पेठे ( २ ) श्री. के. शं. कुलकर्णी.

## होळ नं. २ विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, लि.

सरकारकडून स्वस्त धान्याचा स्टॉक अपुरा मिळूं लागल्यानें ह्या सोसायटीनें खुल्या बाजारांतून धान्य आणून लोकांना पुरविलें. गेल्या महिन्यांत खालीलप्रमाणें धान्य खुल्या बाजारांतून आणून नफा न घेतां उलट कांहीं अंशी तूट सोसून विकलें.

| | |
|---|---|
| ( १ ) ज्वारी १५८ पोतीं | ( ४ ) मैदा ६० पोतीं |
| ( २ ) बाजरी ३० पोतीं | ( ५ ) पोहे १० पोतीं |
| ( ३ ) गरा ५५ पोतीं | ( ६ ) साबुदाणा ५ पोतीं |

वरील धान्य बाहेरून आणण्याच्या कामीं सोसायटीचे चेअरमन श्री. बबूराव बळवंतराव धुमाळ यांचे सतत प्रयत्न चालू आहेत.


## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२९००


**बचतीच्या आकर्षक योजना**

| | व्याजाचा दर |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | ,, ३॥ ,, |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | ,, ५ ,, |

*मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—**ना. शं. कानिटकर**

महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर वापरा. ४, ६ व ८ बैली फाळ व सुटे भाग



तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्



१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )


*भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!*

## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. १० लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. १५ ,, |
| ठेवी | ... | रु. ४१४ ,, |
| खेळतें भांडवल | ... | रु. ४५० ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.



स्थापना १९१८

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

# विविध माहिती

**अणुशक्तीवरील फिरतें वीजकेंद्र**—अणुशक्तीवर विजेचें उत्पादन करणारें एक फिरतें केंद्र रशिआनें तयार केलें आहे. जगांत अशा प्रकारचें हें पहिलेंच वीजनिर्मिति केंद्र आहे असा रशिआचा दावा आहे. ह्या केंद्राचा उपयोग करून देशाच्या दूरच्या व दळणवळणाच्या सोयी नसलेल्या भागांतसुद्धां विजेचा पुरवठा करतां येईल.

**पतिपत्नीचा संयुक्त आयुर्विमा**—आयुर्विमा कॉर्पोरेशननें पतिपत्नींचा संयुक्त आयुर्विमा उतरण्यास पुन्हा प्रारंभ केला आहे. हा विमा हयातीमधील हप्त्यांचा असेल आणि पत्नीला स्वतःचें स्वतंत्र उत्पन्न असेल तरच तो उतरतां येईल. १९६० च्या ऑक्टोबर-पासून अशा प्रकारचा संयुक्त विमा देण्याचें कॉर्पोरेशननें बंद केलें होतें. अशा प्रकारच्या विम्याचा दुरुपयोग केला जाण्याची शक्यता असल्यानें तो बंद करण्यांत आला होता. लग्न झालेल्या आणि विमा उतरलेल्या स्त्रियांपैकी १६ टक्के स्त्रियांनाच स्वतंत्र उत्पन्न असल्याचें आढळून आलें होतें.

**तेलशुद्धीचा कारखाना बांधण्याची तयारी**—इटली देशाच्या सरकारी तेल कंपनीनें भारतांत तेल शुद्ध करण्याचा कारखाना उभारण्याची तयारी दाखविली आहे. कारखाना उभारण्यासाठी इटलीकडून मिळालेल्या कर्जाचा कांहीं हिस्सा वापरण्यांत येणार आहे. कर्जाची मुदत वाढविण्याचें इटलीच्या सरकारनें कबूल केलें आहे. कर्जांतील व वापरलेल्या रकमेचा उपयोग करून पेट्रोल व तज्जन्य पदार्थ ह्यांचे कारखाने काढण्याचा विचार चालू आहे.

**ट्रॉम्बे येथील अणुशक्ति संस्था**—मुंबईजवळील ट्रॉम्बे येथील अणुशक्ति संस्था भारताला भूषणभूत होऊन राहिली आहे. अणुशक्तीचा शांततामय कार्यासाठी उपयोग करण्याच्या भारताच्या धोरणास अनुसरून संस्थेनें अनेक देशांना रेडिओ आयसोटोप्स् पुरविले आहेत. ह्या अणुजनित द्रव्याचा उपयोग शेती, उद्योगधंदे, इस्पितळें, वैद्यकीय संशोधन संस्था, ह्यांना होतो. आंतरराष्ट्रीय अणुशक्ति मंडळालाहि संस्थेनें ह्या द्रव्याचा पुरवठा केला आहे

**किनारापट्टीच्या रस्त्याचा खर्च**—महाराष्ट्रांतील पनवेल-पासून ते थेट कन्याकुमारीपर्यंत भारताच्या पश्चिम किनाऱ्यानजीक मोठा रस्ता करण्याची योजना आहे. ह्या राजरस्त्यासाठी ७·५ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज प्रथम करण्यांत आला होता. परंतु आतां ह्या कामासाठी २३·१५ कोटी रुपये खर्च लागणार आहे. त्यासाठी लागणारा पैसा सरकारजवळ नाहीं असें राज्यसभेंत सांगण्यांत आलें.

**केरळ राज्यांत वीजकेंद्र**—केरळ राज्यांत उष्णतेवर चाल-विण्यांत येणारें एक विद्युत्केंद्र स्थापन करण्याचा विचार करण्यांत येत आहे. केंद्रासंबंधींचा अहवाल राज्याचें वीजमंडळच तयार करणार आहे. विद्युत्केंद्रांत १०० मेगॅवॅट वीज निर्माण करणारी यंत्रसामग्री बसविण्यांत येणार आहे. इंधन म्हणून तेल अगर कोळसा ह्यांचा वापर करण्यांत येईल. केंद्राचें बांधकाम पुरें होण्यास ४–५ वर्षांचा अवधि लागेल.

**सुताची सहकारी गिरणी**—सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारी एक सुताची गिरणी यवतमाळ येथें काढण्यांत येणार आहे. ह्या गिरणींत १२ हजार चात्या असतील. गिरणी उभारण्या-साठी १ कोटी रुपयांचें भांडवल लागेल. त्यापैकीं २० लाखांचें भाग भांडवल शेतकरी स्वतःच उभें करणार आहेत. २० लाख रुपये सरकार देणार आहे.

**गोळवाड्यासाठी जर्मनीची मदत**—हिमाचल प्रदेशांत मंडी ह्या ठिकाणीं एक अद्ययावत् गोळवाडा स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या गोळवाड्यासाठी पश्चिम जर्मनीकडून ५ कोटी रुपयांची रक्कम साहाय्य म्हणून मिळणार आहे. भारताच्या शेतीच्या विकासासाठी जर्मनीकडून मिळणाऱ्या मदतीनें भारताला १९६४ सालीं सुधारलेलें बियाणें, ट्रॅक्टर्स, बागायतीचीं अवजारें, खतें इत्यादींचा पुरवठा करण्यांत येईल.

**राहुरी येथें सहकारी गिरणी**—राहुरी तालुक्यांतील कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनीं सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारी सुताच्या गिरणीची स्थापना करण्याचें ठरविलें आहे. गिरणीसाठी लागणारा परवाना मध्यवर्ती सरकारकडून मिळाला आहे. शेतक-ऱ्यांकडून ५ लाखांचें भाग-भांडवल जमविण्यांत येणार आहे. नगर जिल्ह्यांतील ही दुसरी सहकारी गिरणी होईल. पहिली श्रीरामपूर येथें उभारण्यांत येत आहे.

**खतांचें उत्पादन वाढविण्यावर भर**—भारतामधील शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी किमान किती खत वापरण्यास पाहिजे ह्यासंबंधीं अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय विकास मंडळानें अंदाज केला आहे. मंडळानें केलेल्या अंदाजाप्रमाणें १९७१ सालच्या सुमारास भारतानें ४७ लाख टन रासायनिक खतांचा वापर कराव-यास पाहिजे. मंडळानें अशीहि सूचना केली आहे कीं, ज्या खतांचें उत्पादन भारतांत करणें शक्य असेल तें करण्यासाठी खतांचे नवीन कारखाने काढण्यांत यावेत आणि सध्यां असलेल्या कारखान्यांचा विस्तार करण्यांत यावा. मंडळाचा अहवाल भारत सरकारच्या अन्न खात्याला सादर करण्यांत आला आहे.

**अणुकिरणांचा विधायक उपयोग**—अणुकिरणांचा उपयोग करून समुद्रापासून मिळविलेले अन्नपदार्थ टिकविण्याचा एक कारखाना अमेरिकेंत काढण्यांत आला आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ३० लाख रुपये खर्च आला आहे. समुद्रापासून मिळविलेले खाद्यप्राणी नासण्याची प्रक्रिया अणुकिरणांच्या साह्यानें थांबवितां येऊन ते अधिक काळ ताज्या अवस्थेंत टिकविण्यांत आतां यश मिळालें आहे. खेकडे आणि मासे अणुकिरणांच्या साह्यानें संस्कारित केल्यास ते ३५ दिवसपर्यंत चांगल्या स्थितींत राहूं शकतात. एरव्हीं ते ७ दिवसांपेक्षा अधिक टिकत नाहींत.

**जपानमधील नवा रोग**—जपानमध्यें पित्ताशयाच्या विकृती-मुळें होणारा एक नवीनच रोग आढळून आला असून त्याचा प्रसार झपाट्यानें होत आहे. रोगाच्या लक्षणाबद्दल व त्यावरील उपायांबाबत अद्याप फारशी माहिती उपलब्ध नाहीं. परंतु हा रोग बहुधा रोग्यांना रक्तदान दिल्यावर होत असल्याचें आढळून आलें आहे. जपानमध्यें रक्तदान करणारे धंदेवाईक लोक असून बहुतेक रक्ताच्या बँका त्यांच्याकडूनच रक्त मिळवितात. ह्या लोकांनीं दिलेल्या रक्तांत हेमोग्लोबिन हें द्रव्य अल्प प्रमाणांत असल्याची तक्रार करण्यांत येत आहे.

**तांत्रिक कॉलेजांतील प्रवेश**—म्हैसूर विद्यापीठाचे उपकुल-गुरु डॉ. श्रीमाळी ह्यांनीं बंगलोर येथील युनिव्हर्सिटी एंजिनी-अरिंग कॉलेजमध्यें पुस्तकांच्या बँकेचें उद्घाटन केलें. ह्या प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं, "तांत्रिक कॉलेजांतून प्रवेश मिळविण्या-साठी विद्यार्थ्यांकडून नेहमींच्या फीशिवाय मोठ्या देणग्या मिळवि-ण्याची प्रथा वाईट आहे. कांहीं खाजगी कॉलेजें विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी ३ हजारपासून ५ हजारांपर्यंत देणग्या घेतात असें आढळून आलें आहे."

### आफ्रिकेंत बाजारपेठ मिळविण्याचे प्रयत्न

भारताच्या मालाला आफ्रिकेंत बाजारपेठ मिळवून देण्याचे प्रयत्न करण्याचें ठरवून फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संघटनेनें आपल्यातर्फे एक प्रतिनिधि-मंडळ आफ्रिकेंतील कांहीं देशांचा दौरा करण्यासाठी पाठविलें आहे. हें मंडळ आपल्या २५ दिवसांच्या दौऱ्यांत युगांडा, इथिओपिआ, घाना, कीनिआ, मालावी, नायजेरिआ, उत्तर ऱ्होडेशिआ, सूदान आणि टँगानीका ह्या देशांची बाजारपेठांच्या दृष्टीनें पाहणी करणार आहे. आफ्रिकेंतील कोणत्या देशांतून संयुक्त भांडवलाच्या व्यापारी संघटना काढतां येतील ह्यांचाहि अभ्यास हें मंडळ करणार आहे. मंडळांत लाइट एंजिनिअरिंग, पोलादी फर्निचर, साखर, कापड, ताग, सिमेंट, बोट वाहतूक, इत्यादि धंद्यांचे प्रतिनिधि असून त्यांची निवड सर्व भारतांतून करण्यांत आलेली आहे. कांहीं उद्योगधंद्यांच्या बाबतींत भारत आणि आफ्रिकेंतील देश ह्यांच्यांत आजहि सहकार्य चालूं आहे. पश्चिम युरोपमधील अनेक देशांच्या वसाहती म्हणून नांदत आलेले आफ्रिकेंतील बरेच देश अलीकडे स्वतंत्र झाले आहेत अगर होत आहेत. तथापि, जगांतील इतर अप्रगत देशांप्रमाणेंच हे देशहि आर्थिक व औद्योगिक दृष्ट्या मागासलेले आहेत. त्यामुळें औद्योगिक प्रगति झपाट्यानें करून घेण्याची त्यांना अतिशय आवश्यकता वाटत आहे. भारत हा पश्चिम युरोपांतील देश, अमेरिका, रशिआ, इत्यादि देशांच्या तुलनेनें अप्रगत असला तरी आफ्रिकेंतील नव्यानें मुक्त झालेल्या देशांना थोडीफार मदत करतां येण्यासारख्या परिस्थितींत आहे. आफ्रिकेंतील देशांना कांहीं कम्युनिस्ट देशहि मदत देत आहेत अगर देऊं करीत आहेत. ह्या मदतीमागें कांहीं हेतु असण्याची शक्यता असल्यानें भारतासारख्या मित्रभावानें मदत देणाऱ्या देशांकडून मिळणारी मदत आफ्रिकेंतील मागासलेल्या देशांना अधिक स्वागतार्ह वाटेल.

---

### सावकारी करणारे भिकारी

बंगलोर म्युनिसिपल कॉर्पोरेशननें शहरांतील भिकाऱ्यांची पाहणी केली आहे. ह्या पाहणींत असें आढळून आलें कीं, भीक मागून उदरनिर्वाह करणाऱ्या ह्या लोकांपैकी कांहींजण सावकारीचा व्यवसाय करतात. भिकाऱ्यांच्या आयुष्यक्रमाच्या पाहणीचें काम १९५६ सालीं चालूं करण्यांत आलें होतें. १९६२ अखेर तें पुरें करण्यांत आलें. पाहणीचा अहवाल कॉर्पोरेशनला सादर करण्यांत आला असून त्यावर चर्चाहि करण्यांत येणार आहे. भिकाऱ्यांचें दररोजचें उत्पन्न २५ पैशांपासून २॥ रुपयांपर्यंत असलेलें आढळून आलें. भिकाऱ्यांपैकी ७० टक्के भिकारी धट्टेकट्टे व काम करण्यास लायक असे होते. परंतु त्यांच्यापैकी फारच थोड्यांना काम करण्याची इच्छा होती.

---

### लुधिआना येथें ट्रॅक्टर्सचा कारखाना

लुधिआना येथें दरसाल ३० हजार मोठे ट्रॅक्टर्स आणि १ लाख विद्युत्शक्तीवर चालणारे छोटे नांगर तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांत निघणार आहे. पंजाब राज्यानें शेतीच्या बाबतींत समाधानकारक प्रगति केलेली असल्यामुळें हा मोठा कारखाना तेथेंच निघण्याचा संभव अधिक आहे. पिकावरील किडीचा नाश करण्यासाठी विमानांतून औषधी फवारे मारण्यासाठी अमेरिकेकडून १०० विमानें मिळविण्यांत येणार आहेत. सध्यां हें काम करण्यासाठी फक्त ६ विमानें आहेत.


## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : १, बेंक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई–१ टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४ २५४७८१

: विभागीय कचेरी : महाल : नागपूर. तारेचा पत्ता : फार्मर बँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ४ कोटी ८४ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ४३ लाख |
| ठेवी | ... | ३५ कोटी १४ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ७५ कोटी २५ लाख |

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

: बृहन्मुंबईतील शाखा :

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगांव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्लें ( ७ ) सांताक्रूझ ( ८ ) मुलुंड ( ९ ) चेंबूर (१०) माहीम ( ११ ) शीव ( १२ ) माटुंगा ( १३ ) अंधेरी.

वि. म. जोगळेकर,
जनरल मॅनेजर.

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः–युवर बँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

सेव्हिंग्ज बँक:–३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष–४¼ टक्के, २ वर्षें–४½ टक्के, ३ वर्षें–४¾ टक्के, ४ वर्षें–५ टक्के, ५ वर्षें–५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा–विस्तार

शाखा–१. मुंबई–फोर्ट, २. मुंबई–गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केटयार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१ १२–१९६३

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ११,९३,२५० |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ४,००,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,५०,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., जनरल मॅनेजर.

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी चेअरमन.

# रबी पीक उत्पादन मोहीम

★ अन्नधान्याच्या टंचाईला प्रभावीरीत्या तोंड देण्याचा एकच मार्ग म्हणजे अन्नधान्याचें उत्पादन वाढविणें हा होय.

★ आपण खरीप हंगामांत यासाठी जोरदार प्रयत्न केलेत. आतां रबी हंगामांत गहूं, ज्वारीचें उत्पादन वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यांत येत आहेत.

★ आपण त्यांत सहभागी व्हावें.

★ यंदा सुमारें १ लक्ष २० हजार एकर जादा जमीन ओलिताखालीं आणून त्यांत गव्हाचें उत्पादन करण्यांत येणार आहे.

★ सुमारें अडीच लक्ष एकर जमिनींत पेरल्या जाणाऱ्या ज्वारीच्या पिकांचें किडीपासून संरक्षण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला जाणार आहे.

★ राज्य सरकार या मोहिमेसाठी ५३ लक्ष ७० हजार रुपये खर्च करणार आहे.

★ आपल्या पिकांकरितां कमींत कमी किंमतहि सरकारनें जाहीर केली आहे ती अशी—मध्यम प्रतीचा गहूं रु. ६० क्विंटल, उत्तम प्रतीचा गहूं रु. ६५ क्विंटल, ज्वारी—निकृष्ट दर्जाची ( पिवळी ) रु. ४३ क्विंटल व पांढरी ज्वारी रु. ४५ क्विंटल.


★ आपण ही मोहीम यशस्वी करावी म्हणून आपणांस पुढील सवलती देण्यांत येत आहेत.

- सवलतीच्या दरांत सुधारलेल्या जातीचें गव्हाचें बियाणें व मिश्रखतें.
- गव्हाच्या बियाण्यास लावण्यास मोफत पारायुक्त औषधें.
- गव्हाच्या ओलितासाठीं फिरते पंपिंग सेट्स.
- नद्यानाले यांवर कच्चे बंधारे घालून गव्हास पाणी दिलें तर दर एकरीं २० रुपये मदत.

## अधिक माहितीसाठीं जिल्हा परिषदेच्या कृषि अधिकाऱ्यास भेटा.



प्रगतिचे ३० वें वर्ष



हे लक्ष्मीचे नवदेवालय
इथे श्रमांचा सुफलित संचय
उद्योगाचे उगमस्थान हे,
सौख्याचे संचित !
इथे हो सर्वांचे स्वागत!

**बँक ऑफ महाराष्ट्र लि.** तुमची जिल्हाळ्याची बँक

**आपल्या ९१ शाखांनिशीं तुमच्या सेवेस सिद्ध**

## रिझर्व्ह बँकेचा महागाईवरील एक उपाय

### बँकांना कर्जपुरवठा महाग केला

रिझर्व्ह बँकेनें बँक रेट २५ सप्टेंबर १९६४ पासून ५% केला आहे. त्यापूर्वीं २ जानेवारी, १९६३ पासून तो ४½ % होता. वाढत्या महागाईशीं हा बदल संबंधित आहे. उत्पादनाच्या मानानें पैशाचा पुरवठा अवास्तव मोठा होत चाललेला गेलीं तीन वर्षें दिसत होता; गेल्या वर्षीं तर त्यांत वाढ फारच मोठी झाली. पैशाच्या पुरवठ्याला आळा घालण्याची जरुरी त्यामुळें अधिकच तीव्र झाली आहे. त्याबरोबरच, कर्जाची योग्य ती मोसमी मागणी बँकांना पुरी पाडतां यायलाच हवी. त्यासाठी रिझर्व्ह बँकेनें शेड्यूल्ड बँकांना द्यावयाच्या कर्जाचे बाबतींतील पूर्वीचें कोटा पद्धतीचें नियंत्रण रद्द करून व्याज आकारणीच्या नव्या पद्धतीनें लवचिक नियंत्रण ठेवण्याचें ठरविलें आहे. बँकांच्या लिक्विडिटीच्या प्रमाणावर व्याजाचा दर ह्यापुढें अवलंबून राहणार आहे.

( कॅश + रिझर्व्ह बँक व इतर: बँका ह्यांतील शिलका + सरकारी गेरव्यांतील गुंतवणूक ) वजा ( रिझर्व्ह बँकेकडून घेतलेलें कर्ज + स्टेट बँकेकडून घेतलेलें कर्ज ) ÷ बँकेची लिक्विडिटीची परिस्थिति. ही लिक्विडिटी बँकेच्या डिमांड व टाइम देण्याच्या बेरजेच्या जोंपर्यंत २८% किंवा त्यापेक्षा जास्त आहे, तोंपर्यंत त्या बँकेला बँक रेटनें म्हणजे आतां ५% दरानें रिझर्व्ह बँकेकडून कर्ज मिळेल. वरील प्रकारच्या निव्वळ लिक्विडिटी प्रमाणांत प्रत्येक एक टक्का घटीचे वेळीं रिझर्व्ह बँकेच्या कर्जाचा दर अर्ध्या टक्क्यानें वाढत जाईल. मोठ्या हिंदी आणि विदेशी बँकांना दिलेल्या कर्जावर, ओव्हरड्राफ्टवर आणि डिस्कौंटवर त्यांना जास्तींत जास्त ९% व्याज आकारतां येईल.

अगदीं शॉर्ट टर्म ठेवींवरील व्याजाचे दरहि रिझर्व्ह बँकेनें मर्यादित केले आहेत. सध्यांच्या शॉर्ट टर्म व लाँग टर्म ठेवींवरील व्याजाच्या दरांत पुरेसा मोठा फरक नाहीं; ठेवी आकर्षण्याला तो पोषक नाहीं. चालू खात्यावरील ठेवींना ज्या दरानें व्याज दिलें जातें, त्यापेक्षा ज्या दरानें १४ दिवसांपर्यंतच्या ठेवींना व्याज मिळूं नये; ९० दिवसांपर्यंतच्या ठेवींना जास्तींत जास्त २½% व्याज मिळावें; ९१ दिवसांच्या ठेवीला ४% आणि जास्त मुदतीच्या ठेवींना त्याहून अधिक व्याज योग्य, असेंहि रिझर्व्ह बँकेनें जाहीर केलें आहे.

### नारळीच्या झाडाचा आणखी एक उपयोग

कोंकणांतील लोक नारळीच्या झाडाचा कोणताच भाग वाया जाऊं देऊं देत नाहींत असें म्हणतात. हें झाड इतर कोठल्याहि झाडापेक्षा अधिक उपयुक्त आहे. ह्या उपयोगांत आतां आणखी एका उपयोगाची भर पडली आहे. नारळाच्या करवंटीच्या कोळशाच्या उपयोगानें सिगारेटचा धूर शुद्ध करण्याची युक्ति एका अमेरिकन सिगारेट कंपनीनें काढली आहे. ह्या युक्तीचा उपयोग करून तयार केलेल्या सिगारेटच्या धुरांतून तंबाखूंतील हानिकारक द्रव्यें गाळलीं जातात असें कंपनीचें म्हणणें आहे. ह्या नव्या प्रकारच्या सिगारेटसची जाहिरात कंपनी जोरानें करीत आहे.

### फळांना कृत्रिम पक्वता

दिल्ली, नागपूर, कलकत्ता व मुंबई ह्या शहरांतून आंबे, पपई इत्यादि फळांना कृत्रिमरीत्या पक्वता आणण्यांत येत असल्याचें दिसून आलें आहे. ह्यासाठी एक प्रकारच्या रासायनिक गॅसचा उपयोग करण्यांत येतो. तथापि ह्यामुळें फळांच्या गुणधर्मांत फरक पडतो अगर ती आरोग्याला बाधक होतात, अशा प्रकारचा पुरावा मात्र मिळालेला नाहीं.

सरदारगृह


मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.
— आमचीं वैशिष्ट्यें —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म–शताब्दी दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.
फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
गुगभाट, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

श्री. वा. काळे ह्यांचीं
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें
१ कण आणि क्षण, २ पुढें पाऊल,
३ तुमचें स्थान कोणतें ?

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA
MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.